दिनांक : ११.०४.२०२२

# प्रिझम फौंडेशन

## वार्षिक अहवाल २०२१ - २०२२

प्रिझम फौंडेशनचे संस्थापक, विश्वस्त, विद्यमान खजिनदार श्री. यशवंत गंगाधर पटवर्धन हे मंगळवार दि. १४.१२.२०२१ रोजी अनंतात विलीन झाले. पटवर्धन सरांना प्रिझम फौंडेशन कडून भावपूर्ण श्रध्दांजली देण्यात आली.

- करोनाचा प्रादुर्भाव कमी न झाल्याने यावर्षी सुध्दा तिन्ही शाळा ऑनलाईन सुरू ठेवण्याचा निर्णय ट्रस्ट व संचालिकाने घेतला. त्याप्रमाणे पालकांना सूचना देवून दि. १४ जून २०२१ पासून तीनही शाळा ऑनलाईन सुरू करण्यात आल्या.
- यावर्षी ही व्हिडीओ Wtsapp, या माध्यमाव्दारे तिन्ही शाळेतील विद्यार्थ्यांना शिकविणे सुरू केले आहे.
- सर्व प्रिझम स्टाफला महिन्याचा चौथा शनिवार सुट्टी देण्याचा निर्णय ट्रस्ट व संचालिका यांनी घेतला.

शिक्षक व सेवक वर्ग

- जून व जुलै - प्रत्येक शाळेतील शिक्षक आठवडयातून एक किंवा दोन दिवस शाळेत येवून तास घेतील व शाळेचे कामकाज करतील. सर्व मावशी व काका यांना ठरवून दिलेल्या वारांना शाळेत येवून काम करतील असे ठरले. त्याप्रमाणे शिक्षक व सेवक वर्ग शाळेत येत होते.
- ऑगस्टपासून सर्व शिक्षकांनी संस्थेत येवून काम करण्याचे ठरविण्यात आले. Work from home करणा-यांना 2/3 पगार देण्याचे management ने ठरविले.

सांस्कृतिक कार्यक्रम

- प्रिझम फौंडेशन संस्थापन दिन ट्रस्टी, मुख्याध्यापिका व शिक्षक याच्या उपस्थितीत साधेपणाने साजरा करण्यात आला. यावेळी व्हिडिओ कॉल व्दारे ट्रस्टी वाय. जी. पटवर्धन सर, संचालिका हर्षा मुळे व मुख्याध्यापिका विद्या भागवत यांनी कार्यक्रमात सहभाग घेतला. शिक्षकांनी ऑनलाईन शिक्षण देताना नविन गोष्टी शिकण्यास मिळाल्या व विद्यार्थ्यांना शिकविताना आलेले अनुभव सांगितले.
- जागतिक योग दिनानिमित्त विद्यार्थ्यांना योगासनाचे महत्व सांगण्यात आले. शिक्षिकांनी तासाला योगासने करून घेतली. लार्क व एम.ओ.व्हि.एस शाळेतील शिक्षक, मावशी व काका यांनी योगासनाची प्रात्यक्षिके करण्याचे व्हिडीओ विद्यार्थ्यांना पाठविण्यात आला होता.
- तिन्ही शाळेत वर्षभर विविध सांस्कृतिक कार्यक्रम साजरे करण्यात आले. लोकमान्य टिळक पुण्यतिथी, रक्षाबंधन, दहीहंडी, गुरूपौर्णिमा, गणेशोत्सव, शारदोत्सवा निमित्त स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. काही कार्यक्रमाची YouTube link बनवून विद्यार्थ्यांना पाठविण्यात आली होती. तिन्ही शाळेत दिवाळी पार्टी ची गुगल लिंक पाठवून दिवाळी साजरी करण्यात आली.
- फिनिक्स, लार्क व एम.ओ.व्ही.एस शाळेतील विद्यार्थ्यांना पालखी सोहळा नेहमी प्रमाणे अनुभवता यावा यासाठी प्रिझम मधील सर्व शिक्षक, मावशी व काका यांनी दि. १२ जून रोजी शाळेत येवून संपूर्ण कार्यक्रम प्रत्यक्ष केला, त्याचे शुटिंग करून त्याचा व्हिडीओ तयार केला व त्याची YouTube link बनवून दि. ०२.०७.२०२१ रोजी विद्यार्थ्यांना पाठविण्यात आली होती.

- १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिना निमित्त ध्वजवंदनास ट्रस्टी श्री. वाय.जी.पटवर्धन सर व सौ. रंजनाताई पटवर्धन व सर्व स्टाफ उपस्थित होता. श्री. वाय.जी.पटवर्धन सरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.
- दरवर्षी प्रमाणे शिक्षक दिन साजरा करण्यात आला. शिक्षक दिना निमित्त प्रिझम कडून सर्व शिक्षक व कर्मचारी वर्गाला ई-मेल व्दारे शुभेच्छा पाठवून भेटवस्तू देण्यात आली.
  लायन्स क्लब ऑफ विजयनगर यांच्या तर्फे लार्क शाळेच्या मुख्याध्यापिका स्वाती सगम यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात संस्थेची माहिती सांगण्यात आली.
- कै. कमलाबाई गोडबोले आंतरशालेय कविता पाठांतर स्पर्धा ऑनलाईन घेण्यात आली. नॉर्मल शाळांसाठी परीक्षक व पाहुणे सौ. शिल्पा घोगरे या उपस्थित होत्या. बाहेरील ७ शाळेतील ३५ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला.
  विशेष शाळांसाठी परीक्षक व पाहुणे मा. माधुरी सॅम्युल या उपस्थित होत्या. बाहेरील ६ शाळेतील १७ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. दि. ३०.०९.२०२१ रोजी या कार्यक्रमाची YouTube link upload करण्यात आली. बक्षिसपात्र विद्यार्थ्यांना दि. ०४.१०.२०२१ रोजी संस्थेत बोलवून बक्षिसे देण्यात आली.
- संस्थेत २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. याचदिवशी वार्षिकांक 'तमोहर' चे प्रकाशन करण्यात आले. यावर्षीचा अंक ऑनलाईन एज्युकेशन 'धरलं तर चावतयं' याविषयावर आधारीत असून डॉ. प्राजक्ता कोळपकर यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. हा कार्यक्रमाचे फोटो व व्हिडीओ Face book page, Website व YouTube वर upload करण्यात आले आहेत.

वेबसाईट

- संस्थेतील सर्व विभागातील कार्यक्रमांचे फोटो, व्हिडीओ, YouTube link व त्याबद्दलची माहिती वेबसाईट वर पाठवून अपडेट करण्यात आली.

विद्यार्थी फी

- मागील वर्षीप्रमाणेच शैक्षणिक वर्ष २०२१ – २०२२ फी - रू. ४५,000/- ठेवण्यात आली.

अभ्यास विषयक

- वर्षभर तिन्ही शाळेतील विद्यार्थ्यांना Wtsapp, Audio, Video, Flash card या माध्यमाव्दारे शिकविण्यात आले.
  - ऑडिओ व व्हिडिओ कॉल करून संवाद साधणे,
  - पाठाचे व्हिडिओ करून पाठविणे,
  - शिकवून झालेल्या पाठाचे वर्कशीट देणे,
  - ॲटिव्हिटीचे फोटो किंवा व्हिडिओ पाठवून अभ्यास करण्यास सांगणे.

कायदे विषयक

- ॲड. धामणकर - ILS केस संदर्भात सातत्याने संपर्कात आहोत.

ISO 9001 : 2015

- दि. २४, २५ व २७ ऑगस्ट २०२१ ISO 9001:2015 चे Internal Audit हर्षा मुळे यांनी घेतले.
- नोव्हेंबर मध्ये श्री.प्रविण चौधरी यांनी Google Meet व्दारे Surveillance Audit घेतले.
- फेब्रुवारी मध्ये प्रिझम फौंडेशन, तिन्ही शाळा व प्रशिक्षण केंद्राचे ISO - Internal Audit हर्षा मुळे यांनी घेतले.

मिटिंग

- वाय.जी.पटवर्धन व हर्षा मुळे यांची ट्रस्ट मिटिंग, शाळा, अनेक विषय संदर्भात
- दि. ०१.११.२०२१ Google Meet व्दारे ट्रस्ट मिटिंग झाली. यावेळी सर्व ट्रस्टी व संचालिका उपस्थित होते.
- डिसेंबर मध्ये श्री. किशोर सरपोतदार सर व साधना गोडबोले यांच्याबरोबर संस्थेच्या कामकाजा संदर्भात
- दर महिन्याला डॉ. प्रसाद गोडबोले सरांबरोबर WhatsApp कॉलव्दारे संस्थेच्या कामकाजा संदर्भात
- दि. ०१.०४.२०२२ Micrsoft Team व्दारे ट्रस्ट मिटिंग झाली. यावेळी डॉ. प्रसाद गोडबोले, रोहीत ओगले, साधना गोडबोले, किशोर सरपोतदार व संचालिका उपस्थित होते.

- जून पासून ऑफलाईन शाळा सुरू करणे संदर्भात निर्णय घेण्यात आला.
  हर्षा मुळे यांनी खालील मिटिंग व्हिडीओ कॉलव्दारे घेतल्या -
- तिन्ही मुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका यांच्याबरोबर शाळांचा आढावा, पुढील शैक्षणिक २०२१-२२ चे नियोजन, अॅडमिशन, सेविका कार्यशाळा, सर्व मावशी व काका यांना ठरवून दिलेल्या वारांना शाळेत येवून काम करण्याबाबत
- तिन्ही शाळेतील शिक्षक - अभ्यासक्रम, वर्ग, वेळापत्रक, सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धा, परिक्षा, प्रोजेक्ट व विशेष शिक्षणाबाबत अभ्यास या संदर्भात
- ऑफीस स्टाफ बरोबर सॅलरी, डोनेशन, नोटीस, मेटेन्स संदर्भात
- वाय.जी. पटवर्धन सर व मंजूषा दिवाणजी यांच्याबरोबर सॅलरी, एफ.डी व बॅलेन्स शीट संदर्भात
- विद्या भागवत यांच्याबरोबर वेळोवेळी ऑडिओ व व्हिडीओ कॉल व्दारे कामाचा आढावा घेण्यासंदर्भात
- नेहा परांजपे, छाया पवार व रेवती वंड यांच्याबरोबर आनंद विद्यालय शिरवळ व गुलमोहर रेमिडिअल सेंटर कामा संदर्भात
  हर्षा मुळे यांनी वर्षभर प्रिझम स्टाफ बरोबर खालील मिटिंग घेतल्या :
  - तिन्ही मुख्याध्यापिका -
    - विश्वस्त वाय.जी पटवर्धन सर व रंजनाताई पटवर्धन यांच्याबरोबर फिनिक्स व लार्क शाळेतील Pre-voc group एकत्र करण्याबाबत चर्चा करण्यात आली. एम.ओ.व्हि.एस.शाळेची पुर्नरचना करण्यासंदर्भात,
    - कै. कमला गोडबोले पाठांतर स्पर्धेचे आयोजन, तमोहर लेख व जाहिराती बाबत, बजेट, पुढील वर्षीची फी शाळेचे २०२१-२२ चे वेळापत्रक, अभ्यासक्रम, ऑनलाईन कार्यक्रम, पालक सभा, Reading Project,
      ऑनलाईन गॅदरिंग, वर्षभरातील परिक्षा वेळापत्रक, दिवाळी नंतर शाळा सुरू करण्या बाबत, पुढील कार्यक्रमाचे नियोजन, २६ जानेवारी, मार्च व एप्रिल २०२२ मधील वार्षिक परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना शाळेत बोलविणे, ई-मेल व्दारे पुढील वर्षीच्या सर्व सूचना पालकांना पाठविणे,
      वेन्यू - पालक व शिक्षक वर्कशॉप, इन-हाउस ट्रेनिंग, कोर्स, पुढील वर्षीसाठी टिचर टाईम टेबल करणे.
      शैक्षणिक वर्ष २०२० मध्ये फी न भरलेले व ऑनलाईनला जॉईन न झालेल्या विद्यार्थ्यांबरोबर पुढील वर्षीसाठी संपर्क साधणे, फेब्रुवारीमध्ये पुढील वर्षी येणा-या शिक्षकांची यादी तयार करणे,
      शैक्षणिक वर्ष २०२२ - २३ चे कॅलेंडर, अभ्यासक्रम, पुढील वर्षीच्या नियोजनाबाबत वाचन दिन व विज्ञान दिन साजरे करणे, पुढील वर्षी जास्तीत जास्त शैक्षणिक सहली करणे संदर्भात
    - एम.ओ.व्ही.एस शाळेच्या मुख्याध्यापिकांबरोबर पुढील वर्षासाठी शाळा व कार्यशाळेचे स्वरूप व नियोजन, कॅन्टीन मधील मेन्यू कार्ड व दर ठरविणे
    - विद्यार्थ्यांच्या अॅक्टिव्हिटी संदर्भात बालकल्याण संस्थेला भेट देणे.
    - PF संदर्भातील काही मुद्यांवर चर्चा झाली,
  - शिक्षक
    - एम.ओ.व्ही.एस शिक्षक - गॅस कनेक्शन व सिलिंडर बाबत चर्चा करून gas book update करण्यात आले.
      एम.ओ.व्ही.एस शाळेच्या मुख्याध्यापिका व शिक्षकांबरोबर दि. ०२ मार्च २०२२ पासून शाळा ऑफलाईन सुरू करणे व त्याचे नियोजन संदर्भात
    - लार्क व एम.ओ.व्ही.एस शाळेतील शिक्षकांबरोबर पुढील वर्षीचे नियोजन
  - ऑफीस स्टाफ व अकांउट -
    - श्री. वाय.जी.पटवर्धन सर, रंजनाताई पटवर्धन यांच्याबरोबर अकांउट संदर्भात
    - काही स्पर्धा व कार्यक्रमाचे ऑनलाईन नियोजन, वेबसाईट, फेसबुक, कै. कमलाबाई गोडबोले पाठांतर स्पर्धा, तमोहर, विद्यार्थी, देणगीदार, हितचिंतक यांचे फोन नंबर व ई-मेल आयडी अपडेट करणे संदर्भात
    - अकांउट डिपार्टमेंट बरोबर बजेट संदर्भात
    - दर महिन्याला संस्थेच्या सर्व शाळांच्या कामासंदर्भात
- पालक सभा
    - फिनिक्स, लार्क व एम.ओ.व्ही.एस शाळेतील पालक सभेत फी, ऑनलाईन शिक्षण, कार्यक्रम इ. बाबत पालकांशी संवाद साधला.
    - फिनिक्स शाळेतील पालकांबरोबर अभ्यासक्रम, परीक्षा व शाळेतील इतर विषयासंदर्भात
- सर्व सेवक व सेविकांबरोबर जून २०२२ पासून प्रत्यक्ष शाळा सुरू होणार, विद्यार्थी शाळेत आल्यावर घेण्याची काळजी यासंदर्भात

- जून २०२२ पासून शाळा सुरू होण्या संदर्भात सर्व रिक्षाकाकांबरोबर मिटिंग घेण्यात आली .
- इतर मिटिंग
  - ज्ञानदा जोशी - नाशिक मध्ये शाळा सुरू करण्यासाठीचे मार्गदर्शन
  - रोटरी क्लब ऑफ पुणेचे श्री . खुर्जेकर प्रिझमचा नविन बोर्ड करून घेण्यासंदर्भात
  - श्री नाव्हरकर ( मुलगा ईशान ) यांच्याबरोबर फिनिक्स शाळेतील ॲडमिशन संदर्भात
  - U- Broad Brand, BSNL, Hatway यांच्या बरोबर Wi-Fi घेण्या संदर्भात
  - लायन्स क्लब श्री . शहाणे यांनी शिक्षक दिनानिमित्त भेट दिली .
  - अमिता नेने यांच्याबरोबर एम . ओ . व्ही . एस शाळेतील काम व शिक्षकांसाठी सेशन्स घेण्यासंदर्भात
  - स्नेहल बर्वे व सानिका सुदामे नविन शिक्षिका म्हणून
  - नितीन राजहंस यांच्याबरोबर वार्षिकांक तमोहर कामा संदर्भात
  - संतोष कुलकर्णी यांच्याबरोबर वॉकर व व्हिलचेअर संदर्भात
  - विप्रदा गद्रे यांच्याबरोबर नविन व जुन्या विद्यार्थ्यांचे टेस्टिंग करण्यासंदर्भात
  - श्रीराम ओक -सुश्री फौंडेशन तर्फे भरविण्यात येणा-या रक्तदान शिबिर व रांगोळी स्पर्धे संदर्भात
  - GTT संस्थेच्या गंधाली देशपांडे यांच्याकडून विशेष विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षणाबाबत काम समजावून घेवून प्रिझमची फौंडेशनची माहिती देण्यात आली .
  - श्वेता साठे याच्या बरोबर नविन विद्यार्थी टेस्टिंग करण्यासंदर्भात
  - स्नेहल बर्वे यांच्याबरोबर फिनिक्स शाळेतील कामा संदर्भात
  - श्रीराम ओक यांच्याबरोबर तमोहर वाचनाची क्लिप तयार करून YouTube वर upload करण्याबाबत व मुलांसाठीचे रानवारा मासिक
  - भरत देसाई, सुभाष देसाई व दादा मुळे यांच्या बरोबर हास्य योगाचा पायलेट प्रोजेक्ट करण्याबाबत
  - संगीता शिरोडे यांच्याबरोबर S.N.D.T College B.Ed ( LD) व फिनिक्स स्कूल मध्ये प्रशिक्षणार्थी यांची Internship याबाबत करार करण्यात आला . यासंदर्भात RCI च्या काही अधिका-यांनी संस्थेला भेट देवून माहिती घेतली .
  - मीना शेंडकर यांच्याबरोबर अध्ययन अक्षमता या विषयावर मार्गदर्शन व लेक्चर घेण्यासंदर्भात
  - योगेश व योगिता कुलकर्णी यांच्याबरोबर त्यांचे शिवणकाम प्रिझम कडून करून घेण्याबाबत
  - डॉ . काकतकर विद्यार्थ्यांसाठी योगा, ब्रहमविद्याचे तास घेण्यासंदर्भात
  - निखिल उंबरकर यांना संस्थेची माहिती देण्यात आली, पणत्या व इतर वस्तू दाखविण्यात आल्या . श्री . कदम, श्री को-हाले, रेडिओ सिटी - अजिंक्य, डॉ . विनित अरोरा, अयोध्या चॅरिटेबल ट्रस्ट मधील स्पेशल बी एड च्या विद्यार्थीनी, चेतना-सेवा सहयोगच्या अनिता घाटणेकर, प्राज संस्थेच्या डॉ . प्राजक्ता कोळपकर, साप्ताहिक विवेक मधील झोरे आणि घांग्रेकर यांच्याबरोबर संस्थेची माहिती देण्यासंदर्भात
  - आशिष महाबळ यांच्याबरोबर वेळोवेळी construction काम करण्यासंदर्भात, श्री . शैलेश बुरसे यांच्याबरोबर Fabrication नविन बोर्ड करून घेण्या संदर्भात, क्रांती पवार यांच्याबरोबर CCTV, EPBX व BSNL कामासंदर्भात व श्री . आपटे यांच्याबरोबर बोअरवेल कामासंदर्भात
  - संचालिका व फिनिक्स शाळेच्या मुख्याध्यापिका यांनी शिक्षक नियुक्ती साठी ४ मुलाखती घेतल्या .
- नवनाथ कांबळे यांच्या बरोबर गणेश कांबळे यांना कामावर रूजू करून घेण्यासंदर्भात

आनंद विद्यालय - शिरवळ व गुलमोहर रेमिडिअल सेंटर - सातारा

- जुलै व ऑगस्ट - नेहा परांजपे, छाया पवार व रेवती बंड यांच्याबरोबर व्हिडीओ कॉलव्दारे आनंद विद्यालय शिरवळ व गुलमोहर रेमिडिअल सेंटर च्या कामा संदर्भात
- आनंद विद्यालय - शिरवळ छाया पवार यांनी हर्षा मुळे यांच्याबरोबर व्हीडीओ कॉलव्दार मिटिंग घेतली .
- आनंद विद्यालयातील नविन ६ विद्यार्थ्यांचे टेस्टिंग क्षमा उपासनी यांनी केले असून पालकांना रिपोर्टही देण्यात आला .
- आनंद विद्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त असलेल्या कार्यक्रमास विश्वस्त श्री . वाय . जी . पटवर्धन सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते व संचालिका हर्षा मुळे याही उपस्थित होत्या .
- जानेवारी मध्ये फोन कॉलव्दारे शाळेचा आढावा घेण्यात आला .

- दि. २१.०२.२०२२ रोजी गुलमोहर रेमिडिअल सेंटर - हर्षा मुळे, नेहा परांजपे, शिरीष पवार व रेवती बंड यांची कॉन्फरन्स कॉल व्दारे मिटिंग झाली. यामध्ये सेंटरच्या कामकाजा विषयी चर्चा करण्यात आले.
- जुलै व सप्टेंबर ते मार्च पर्यंत हर्षा मुळे, नेहा परांजपे, व शिरीष पवार यांनी दोन्ही शाळांना भेट देवून कामकाजाचा आढावा घेतला.

प्रोजेक्ट

- प्रिझम फौंडेशनला CSR Certificate मिळाले आहे.
  - Kirloskar Cummins India Foundation - Niddhi Navadia
  - Synechron - D. Shrisathe

  } CSR मधून डोनेशन साठी प्रोजेक्ट पाठविण्यात आला.
- श्री. किशोर सरपोतदार सरांनी डोनेशन साठी प्रोजेक्ट पाठविला होता.
  श्री. अभय सरपोतदार मिराकंज फौंडेशन कडून रू. ७५,000/- डोनेशन मिळाले.

जागरूकता

- किराट दिवाळी पत्रिका - रत्नागिरी येथे संस्थेची व कोविड १९ च्या परिस्थितीत ही विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण माहीती छापून आली आहे.
- प्रिझम ने विशेष शाळा असूनही कोविड १९ परिस्थिती मध्ये ऑनलाईन कविता पाठांतर स्पर्धा घेतली. या आशयाची बातमी लोकसत्ता वृत्तपत्रामध्ये छापण्यास पाठविण्यात आली होती.
- प्रिझम फौंडेशन मध्ये श्रीराम ओक -सुश्री फौंडेशन तर्फे रक्तदान शिविर आयोजित करण्यात आले होते. या शिविरात संस्थेची माहिती देण्यात येवून माहितीपत्रक व तमोहर अंक देण्यात आले.

कार्यशाळा

- हर्षा मुळे यांनी 'व्यवस्थापन कौशल्य' व ‘वेळेचे व्यवस्थापन’ व 'नियोजन' या विषयावर सर्व मुख्याध्यापिका,पर्यवेक्षिका व ऑफीस स्टाफ यांच्यासाठी पाच कार्यशाळा घेतल्या.
- हर्षा मुळे यांनी योगा व सामान्यज्ञान या विषयावर सर्व सेवक वर्गासाठी दोन कार्यशाळा घेतल्या.

## Account

- PF च्या कामे संदर्भात श्री. संतोष कालबान्दे यांच्याशी संपर्क करून पूर्ण करण्यात आली.
- कर आकारणी व कर संकलन कार्यालय, पुणे महानगरपालिका येथून श्री. उमेश कांबळे या अधिका-याने संस्थेतेच्या परिसराची पाहणी करून मोजमाप केले व प्रिझम फौंडेशनच्या नावाने प्रॉपर्टी टॅक्सच्या रक्कमेबावत प्रिझमला नोटीस व बील आले होते. यासंदर्भात मुख्य अधिकारी श्री. विलास कानडे यांच्याशी संचालिकेने भेट घेवून संस्थेची माहिती दिली. बील आले त्याप्रमाणे प्रॉपर्टी टॅक्स भरण्यात आला.
- Vehicle Tax, Professional Tax, Property Tax हे सर्व भरण्यात आले.
- सध्या काम करीत असलेल्या प्रिझम स्टाफला सॅलरी सपोर्ट फंड देण्यात आला.

बाहेरील कार्यशाळा

- दि. ०८.०२.२०२२ रोजी बालकल्याण संस्थेने आयोजित केलेल्या अक्षर - लेखन (कॅलिग्राफी) या विषयावरील कार्य शाळेस फिनिक्स शाळेतून उषा अंभोरे व एम.ओ.व्ही.एस शाळेतून सुवर्णा वावळे या शिक्षिका सहभागी झाल्या होत्या.
- दि. ०३ व दि. ०४.०३.२०२२ रोजी बालकल्याण संस्थेने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय प्रथमोपचार शिबिरास संस्थेतील तीन सेविका सहभागी झाल्या होत्या.

भेट

- सोनदरा गुरूकुलम् डोमरी व ज्ञानसंवर्धिनी हराळी येथे वाय.जी.पटवर्धन सर, रंजनाताई पटवर्धन व हर्षा मुळे यांनी भेट दिली. तेथील विश्वस्त व शिक्षकांबरोबर मिटिंग घेण्यात आली. शाळेच्या नविन इमारतीची पाहणी करण्यात आली. ज्ञानसंवर्धिनी हराळी - सर्व शाळेचा आढावा घेण्यात आला. पूरक शिक्षण विषयी माहिती घेण्यात आली.
- समर्थ एन्टरप्रायझेस् - जांभुळवाडी येथे हर्षा मुळे व स्वाती सगम यांनी प्रत्यक्ष भेट देवून द्रोण मशीनचे विविध प्रकार पाहिले.

आनंद विद्यालय - शिरवळ

- यावर्षी शाळेत एकूण ५0 विद्यार्थी आहेत.
- वर्षभर विविध सांस्कृतिक सण, दिन साजरे करून विद्यार्थ्यांना त्याविषयी माहिती देण्यात आली. २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी कवायत प्रकार व रिबीन डान्सचे सादरीकरण केले.
- नविन सहा विद्यार्थ्यांचे ट्रेस्टिंग करून रिपोर्ट देण्यात आले.
- विज्ञान या विषयांतर्गत विज्ञान साहित्य प्रदर्शन प्रश्नमंजूषा घेण्यात आली. गणित विषया साठी प्रश्नमंजुषा घेण्यात आली. विज्ञान दिना निमित्त रांगोळी काढणे, शास्त्रज्ञाची माहिती सांगणे, विज्ञान कोडी सोडवणे, विज्ञान प्रयोगाचे प्रदर्शन, अवकाश तंत्रज्ञानाची माहिती सांगणे व गृहविज्ञान
- दि. २१.0८.२0२१ रोजी आनंद विद्यालयाचा पाचवा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास मा. यशवंत पटवर्धन, डॉ. जोगळेकर, मा. नेहा परांजपे, मा. हर्षा मुळे, मा. रमेश देशपांडे उपस्थित होते. या कार्यक्रमात आनंद विद्यालयातील शिक्षकांनी 'हात' याविषयावर प्रकल्पाची मांडणी केली होती. इ. १0 वी च्या विद्यार्थ्यांचा स्कूल बॅग देवून गुणगौरव करण्यात आला. आनंद विद्यालयातील सर्व शिक्षकांना सन्मानचिन्ह देवून त्यांचा सन्मान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन केले. पालक श्री. नितीन गायकवाड यांनी ४८ विद्यार्थ्यांना कार्यानुभव साठी लागणारे साहित्य भेट म्हणून दिले.
- विद्यार्थ्यांना लघुत्त्तरी प्रश्न आकलन होवून त्याचे उत्तर लिहिताना अडचण येते. त्यासाठी शिक्षकांनी विविध शैक्षणिक पध्दती वापरल्या.
- क्षेत्र भेट : अध्यापनातील घटक विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे आकलन होण्यासाठी विविध ठिकाणी क्षेत्रभेट देण्यात आल्या. परांजपे ऑटोकास्ट प्रा. लि. सांगवी या कंपनी, विजय मेडिकल स्टोअरला भेट देण्यात आली. एकूण ३0 विद्यार्थ्यांनी भेट दिली. विज्ञान विषयांतर्गत अश्वमेध डेंटल लॅब, परस बागेतील भाजीपाला लागवड व वेगवेगळया पानांची रचना, परिसर अभ्यासांतर्गत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ओढयाच्या ठिकाणी नेऊन पाण्याचे होणारे प्रदूषण दाखवले.
- उपक्रम - विद्यार्थ्यांना क्षेत्रभेटीतून वेगवेगळया पानांचा प्रकार माहिती व्हावेत यासाठी सर्व पानांच्या प्रकारांचे प्रदर्शन मांडून त्या पानांची नावे व त्या पानांचे प्रकार विद्यार्थ्यांना सांगितले. तसेच संयुक्त पानांचे वर्गीकरण विद्यार्थ्यांनी केले.
- गृहआरोग्य : वर्षभर विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे खाद्य पदार्थ, सरबत करणे. तसेच घरकामात मदत करणे इ. ॲटिव्हिटी पूर्ण केल्या.
- कार्यानुभव- विद्यार्थ्यांकडून शिवणकाम, हस्तकलेचे विविध उपक्रम करून घेण्यात आले.
- स्पर्धा : कर्नवडी येथील कुस्ती स्पर्धेत धनराज भोसले या विद्यार्थ्याने भाग घेवून स्पर्धा जिंकली.
- ऑनलाइन मार्गदर्शन : मा. चित्रा दाभोळकर यांनी 'आत्मभान जागवताना' याविषयावर मार्गदर्शन केले. एन. जी. परांजपे ऑटोकास्ट यांच्या तर्फे मा. संध्या राडकर यांनी सॉक्सपासून विविध प्रकारचे प्राणी व कागदापासून पपेटस् तयार करण्यास शिकविले.

  शांता मेमोरियल फौंडेशन यांनी अध्ययन अक्षमता याविषयावर शिक्षिकांची कार्यशाळा घेतली.
- महाराष्ट्र शासन व राज्य विज्ञान परिषद पुणे याच्या संयुक्त विद्यमाने विज्ञान प्रयोग संदर्भात आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन मा. श्री. सुधीर अय्यपा आमनगे यांनी केले. येथे शाळेतील एक शिक्षिका सहभागी झाल्या होत्या.
- भेट -मा. नेहा परांजपे, डॉ. जोगळेकर, मा. देशपांडे सर, मा. सोनाली मालवणकर यांनी शाळेला भेट दिली.
- Writing communication and Presentation skill या विषयाचे प्रशिक्षण छायाताई पवार यांनी घेतले.
- डॉ. जोगळेकर, श्री. देशपांडे, नेहा परांजपे व शिरीष पवार यांच्या उपस्थितीत वार्षिक बक्षिस वितरण समारंभ संपन्न झाला.
- महिला दिनानिमित्त 'गतिरूध्द विद्यार्थ्यांसाठी' समर्पित भावनेने करीत असलेल्या कामाचे कौतुक म्हणून महिला मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती गिरीजा चिरपुटकर यांच्या हस्ते छाया पवार यांचा सत्कार करण्यात आला.
- श्री. बरदाडे यांनी 'पावन खिंड' हा चित्रपट सर्व विद्यार्थ्यांना विनामूल्य दाखविला.
- पालकांची बदली झाली असल्याकारणाने दोन विद्यार्थ्यांचे नाव कमी करण्यात आले.
- दर महिन्याला शिक्षकांबरोबर मिटिंग घेण्यात येत होत्या.
- देणगी - परांजपे ऑटोकास्ट प्रा. लि. कं सांगवी यांच्याकडून ओडिओ रेकॉर्डर भेट म्हणून दिला. देणगी स्वरूपात एकूण २ पालकांनी खुर्च्या दिल्या. १0 पालकांनी मिळून २६ खुर्च्या व डॉ. सायली धस यांनी ६ खुर्च्या विद्यालयास भेट स्वरूपात

दिल्या. डॉ. विनय जोगळेकर यांनी विद्यार्थ्यांच्या खाऊसाठी रू. १000/ , सौ. गौरी नेवसे ३0 रायटिंग पॅड, ५0 चित्रकला वहया, ३0 पेन्सिल, श्री. महेश पवार यांनी ६0 पेन, ६0 छोटया वहया विद्यार्थ्यांना बक्षिस स्वरूपात भेट दिल्या.

- वर्षभर नेहा परांजपे, हर्षा मुळे व शिरीष पवार सर यांनी विद्यालयास भेट देवून कामकाजाची पाहणी केली.
- हर्षा मुळे व नेहा परांजपे यांनी वेळोवेळी व्हिडीओ कॉन्फरन्स कॉल व्दारे संपर्क करून कामकाजाची माहिती व मार्गदर्शन केले.

गुलमोहोर रेमिडिअल सेंटर

- सेंटर मध्ये १ समन्वयक, २ शिक्षक व १ शिपाई कार्यरत असून सेंटर मध्ये एकूण विद्यार्थी संख्या ११ आहे.
- विविध सांस्कृतिक सण, दिन साजरे करून विद्यार्थ्यांना त्याविषयी माहिती देण्यात आली.
- सत्विंदर कौर यांनी सेंटरला भेट देवून माहिती घेतली.
- इशा प्ले स्कूलला भेट देण्यात आली. तेथील तीन विद्यार्थ्यांचे निरीक्षण करून पालकांना मार्गदर्शन करण्यात आले.
- पालकसभा घेण्यात आल्या.

दुरूस्ती

- खत तयार करण्याच्या दृष्टीने खत प्रकल्पाची साफ सफाई करून काम करण्यास सुरू केले आहे.
- संस्थेच्या आवारातील मागील बाजूस नविन फरशी बसून घेण्यात आली.
- संस्थेचे दोन नविन (१ - गेटवर प्रिझम फौंडेशनचा व २ - रोडवर प्रिझम फौंडेशनची माहिती) बोर्ड बनवून घेण्यात आले.
- वर्षभरात कॉम्प्युटर, लॅपटॉप व प्रिंन्टर EPBX & BSNL, इलेक्ट्रिकसिटी, प्लंबिंग, बांधकाम, फेब्रिकेशन व CCTV Camera यावर आवश्यकतेनुसार कामे करून घेण्यात आली.

राजीनामा

- फिनिक्स शाळेतील शिक्षिका प्रतिभा कुलकर्णी यांनी व्यक्तिगत कारणामुळे जून २0२२ पासूनचा राजीनामा दिला.

इतर

- Sandesh Phalke - , IIT Guwahati, Assam - collaboration on the research project form submission and letter given.
- Trustee, Prism Staff, Parents, Donor, Well wisher, Guest, Resource Person यांचे E-mail ID Group बनविण्यात आले आहेत. या गुप वर दिवाळी ग्रिटिंग, नवीन वर्ष २0२२ चे ग्रिटिंग पाठवून शुभेच्छा देण्यात आल्या.
- प्रिझमच्या संपूर्ण परिसर, सर्व ऑफिस व वर्ग खोल्या मधे पेस्ट कंट्रोल करण्यात आले.
- वर्षभर सर्व वर्ग स्वच्छता व सॅनिटायझर करणे सुरू होते.
- सर्व प्रिझम स्टाफचे लसीकरण झाले असून सर्वांनी लसीकरणाचे प्रमाणपत्र दिले आहे.
- प्रिझम फौंडेशनला एकूण ४0 व्यक्तींनी भेट दिली.

देणगी

- प्रिझम फोंडेशनला देणगी देण्यासंदर्भात आवाहन पत्र पाठवित आहोत.

हर्षा मुळे
संचालिका
प्रिझम फौंडेशन